छत्रपती संभाजीनगर । बीड । परभणी । लातूर । धाराशिव । नांदेड येथून एकाच वेळी प्रकाशित होणार दैनिक

दैनिक

बीड, छत्रपती संभाजीनगर,लातूर, धाराशिव, परभणी, जालना,नांदेड

मराठवाड्याचे प्रत्येक घडामोडीचे दर्पण

# मराठवाडा दर्शन

Mo.9028349999

E-Mail : marathwadadarshannews@gmail.com

MARATHWADA DARSHAN

संपादक : दत्तात्रय बालासाहेब हंडीबाग

**प्रतिनिधी पाहिजेत**

" दैनिक मराठवाडा दर्शनसाठी "
मराठवाड्यातील सर्व जिल्हे
तालुका, गावस्तरावर
प्रतिनिधी नेमणे आहेत.

:: संपर्क ::

MO.9028349999

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | मराठी | वर्ष -०३ | अंक -१५८ | गुरूवार दि.२६ फेब्रुवारी २०२६ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७७८५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | DAILY | MARATHI | Year-03 | Issue 158 | THURSDAY DT.26 FEBRUARY 2026 | RNI : MAHMAR/2023/87785 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# सातारा गॅझेट लागू करा
# अन्यथा पुन्हा उपोषण

## मनोज जरांगे पाटील यांचा राज्य सरकारला इशारा

परभणी : प्रतिनिधी

कुणबी प्रमाणपत्रासाठी आलेल्या प्रत्येक अर्जदाराला प्रमाणपत्र द्या, याच अधिवेशनात सातारा गॅझेट लागू करा अन्यथा जूनमध्ये उपोषणाला बसणार असल्याचा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी दिला. मराठा समाजामुळेच हे सरकार सत्तेवर आले. सरकारने न्याय नाही दिला तर २०२९ मध्ये हाच समाज भाजपाला पायउतार करेल, असा इशारा जरांगे पाटील यांनी परभणीत दिला.

परभणीत शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी बाधित शेतकरी उपोषणाला बसलेले आहेत. आज याच शेतक-यांना मनोज जरांगे पाटील यांनी भेट दिली आणि आणि शेतक-यांशी चर्चा केली. आपले म्हणणे सरकार दरबारी मांडले पाहिजे, असेही मनोज जरांगे म्हणाले. त्याचबरोबर त्यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी देखील फोनवरून चर्चा केली. महसूलमंत्र्यांसोबत शेतक-यांच्या बैठकीचे आयोजनही करण्यात आले. शेतक-यांना जर शक्तिपीठ महामार्गाला जमिनी द्यायच्या नसतील तर सरकार याबाबत सकारात्मक निर्णय घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सरकारने जीआर काढला. पण त्याची अंमलबजावणी अधिकारी, कर्मचारी करत नाहीत. मोठ्या प्रमाणावर कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज येऊन पडले आहेत. पण त्यांना प्रमाणपत्र दिले जात नाही. त्याचबरोबर कास्ट व्हॅलिडिटीसाठीही अडवणूक केली जाते. सरकारकडून याविषयी अद्याप कारवाई करण्यात आली नाही, असे ते म्हणाले.

गॅझेटची अंमलबजावणी
तातडीने करा : जरांगे

दरम्यान, याच अर्थसंकल्पीय अधिवेशनात एक परिपत्रक काढून मराठा कुणबी प्रमाणपत्र मोठ्या प्रमाणावर दिली जातील. त्याचबरोबर सातारा गॅझेट, औंध गॅझेटची अंमलबजावणी करण्यासंदर्भात देखील शासन निर्णय सरकारने काढावा, असे जरांगे म्हणाले.



# धानोरा मंडळाचे मंडळाधिकारी मुख्यालयापासून दूर

## परजिल्ह्यात वास्तव्यास ?

### ग्रामस्थ संतप्त; जिल्हाधिकारी साहेब कारवाई करणार का?

अफसर पठाण/आष्टी

आष्टी तालुक्यातील धानोरा मंडळानर्गत धानोरासह वाघळूज, टाकळी अमिया, खुंटेफळ,कानडी खुर्द, हिवरा हे सज्जे येत असून याठिकाणी शेतकऱ्यांना येणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी मंडळाधिकारी यांची गरज असते पण धानोऱ्याचे मंडळाधिकारी मुख्यालयात न थांबता परजिल्ह्यात राहात असल्याची चर्चा सध्या परिसरात जोर धरत आहे. शासन नियमांनुसार अधिकारी मुख्यालयी राहणे बंधनकारक असताना प्रत्यक्षात मात्र संबंधित अधिकारी मुख्यालयात क्वचितच दिसत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे.

महसूल विभागाशी संबंधित कामांसाठी शेतकरी व नागरिकांना वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. पंचनामे,फेरफार,दाखले आदी कामे प्रलंबित राहत असल्याने शेतकऱ्याचा रोष वाढत आहे. अधिकारी मुख्यालयात उपलब्ध नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.जर अधिकारी परजिल्ह्यात वास्तव्यास असतील,तर मुख्यालयी उपस्थिती कशी राहते?आणि कामकाज सुरळीत कसे पार पडते?असा थेट सवाल आता उपस्थित होत आहे.

नियम वेगळे आणि वास्तव वेगळं?

मंडळाधिकारी नेमके कुठे वास्तव्यास आहेत? मुख्यालयी राहण्याचा नियम असतांना तो नियम का पाळला जात नाही? का त्यांना वेगळा नियम आहे का? यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याबाबत पडताळणी करणे गरजेचे वाटत नाही का? यामुळे शेतकऱ्यांच्या कामकाजावर परिणाम झाल्यास जबाबदार कोण? असा प्रश्न विचारला जात आहे,असा मंडळाधिकारी यांच्या कार्यपद्धती वर जिल्हाधिकारी साहेब लक्ष घालणार का?अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. नाहीतर अधिकारी परजिल्ह्यात आणि जनता मात्र प्रतीक्षेत अशीच स्थिती कायम राहणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



## श्रीमुक्तानंद महाविद्यालय येथे संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

(अलकनंदा मोरे, गंगापूर,प्रतिनिधी):गंगापूर येथील श्री मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर.जे.चव्हाण होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. वैशाली बागुल, डॉ. बाळासाहेब पवार, डॉ. विशाल साबणे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. विठ्ठल फुलारी,रा.से.यो. सहाय्यक कार्यक्रमाधिकारी श्री.पी.एम.जाधव तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी संत गाडगेबाबा यांच्या समाजप्रबोधन, स्वच्छता अभियान आणि अंधश्रद्धा निर्मूलन कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला.विद्यार्थ्यांनीही त्यांच्या विचारांवर भाष्य करत समाजसेवेची प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. फिरोज सय्यद यांनी केले.

## हमीभाव कापूस सी.सी.आय खरेदीची मुदत एप्रील २०२६ अखेर करावी – राजकिशोर मोदी ॲड.विष्णुपंत सोळंके यांची मागणी

उपमुख्यमंत्री व सहकार मंत्र्यांना दिले निवेदन

अंबाजोगाई (प्रतिनिधी) उमेश शिंदे

कापूस खरेदी हंगाम २०२५-२०२६ मध्ये कापूस उत्पादीत शेतकऱ्यांचे कापसाला किमान आधारभुत किंमत (हमीभाव) योजनेत राज्यातील कापूस खरेदी अंतर्गत सी.सी.आयकडून कापूस खरेदीची अंतीम तारिख २७/०२/२०२६ देण्यात आलेली आहे. राज्यातील असंख्य कापूस उत्पादीत शेतकऱ्यांचा कापुस विक्रीसाठीचे सी.सी.आयचे अनेक तांत्रिक आणि नेटवर्कच्या कारणांमुळे खूप मोठा कापूस अद्याप ही विक्री करणे राहिलेला आहे. हंगाम सुरूवातीचे लांबलेल्या पावसामुळे कापूस हंगाम विस्कळीत झाला आहे. तसेच विक्रीसाठी सी.सी.आयकडे आणण्यासाठी शेतकऱ्यांनी कपास किसान ॲपवर नोंदणी करण्यासाठीची तारीख ३० डिसेंबर २०२५ ठेवली होती. असंख्य शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे ती पुढे १५ जानेवारी २०२६ पर्यंतच करणेत आली. आजही असंख्य शेतकरी हे नोंदणी अभावी सी.सी.आयकडे त्यांचा उत्पादीत कापूस विक्रीसाठी आणु शकत नसल्यामुळे अशा शेतकऱ्यांचे खूप नुकसान होत असल्यामुळे शेतकऱ्यांना कपास किसान ॲपवर नोंदणी करणेची मुदत ही यापुढे ३० एप्रील २०२६ पर्यंत करणेत यावी. अशी मागणी महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक व पणन महासंघाचे संचालक राजकिशोर मोदी व संचालक ॲड.विष्णुपंत सोळंके यांनी केली आहे.

यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक व पणन महासंघाचे संचालक राजकिशोर मोदी व संचालक ॲड.विष्णुपंत सोळंके यांनी नमूद



केले आहे की, सी.सी.आय कापूस खरेदी हमी भाव प्रति क्विंटल रू.८०००/- एवढा असून सध्या बाजारात कापूस खरेदी प्रति क्विंटल रूपये ७३०० ते ७५००/- एवढी चालु आहे. शेतकऱ्यांना सी.सी.आय कापूस विक्रीसाठी मुदत वाढवून ३० एप्रील २०२६ पर्यंत वाढवून दिली नाही तर बाजारातील कापसाचे भाव प्रति क्विंटल भाव ७०० रूपयांपर्यंत ही कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत सी.सी.आयकडे उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, सहकारमंत्री ना.बाबासाहेब पाटील यांचेकडे निवेदन देवून सोमवार, दि. २३/०२/२०२६ रोजी आम्ही मागणी केलेली आहे अशी माहिती महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक व पणन महासंघाचे संचालक राजकिशोर मोदी व संचालक ॲड.विष्णुपंत सोळंके यांनी दिली आहे.

# एसटीतील करोडो-अरबोंचा भ्रष्टाचार थांबवा


## महिला व ज्येष्ठांच्या सवलतींना हात लावू नका – नितीन जायभाये यांचा इशारा

परिवहन विभाग व राज्य शासनाने चुकीचे आर्थिक घोरण बदलावे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राची व ग्रामिण व्यवस्थेची जीवनवाहिनी असलेल्या राज्य परिवहन महामंडळाबाबत (एसटी) सुरू असलेल्या निर्णय प्रक्रियेवर तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. महिलांचे अर्धे तिकीट आणि ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना दिली जाणारी मोफत प्रवास सुविधा बंद करण्याचा विचार सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते नितीन जायभाये यांनी आक्रमक भूमिका घेत सरकारला थेट इशारा दिला आहे.

एसटी तोट्यात असेल, तर त्याला सामान्य जनता जबाबदार नाही. चुकीची आर्थिक धोरणे, व्यवस्थापनातील त्रुटी आणि मेंटेनन्समधील करोडो-अरबोंचा भ्रष्टाचार हेच खरे कारण आहे. सवलती बंद करून सरकार स्वतःच्या अपयशावर पांघरूण घालत आहे, असा घणाघाती आरोप त्यांनी केला.एसटी ही केवळ वाहतूक सेवा नसून ग्रामीण महाराष्ट्राचा श्वास असल्याचे सांगत नितीन जायभाये म्हणाले, शेतकरी, कामगार, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक आणि विशेषतः माता-भगिनींचा आधार म्हणजे एसटी. महिलांचे अर्धे तिकीट हे दान नसून त्यांचा हक्क आहे. ते बंद करणे म्हणजे त्यांच्या स्वावलंबनावर घाला घालणे होय. तसेच ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास हा त्यांचा सन्मान आहे. हा सन्मान हिरावून घेणे म्हणजे त्यांच्या आयुष्यभराच्या कष्टांचा अपमान आहे.



'सवलती बंद नकोत, भ्रष्टाचार बंद करा!'जायभाये यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, एसटी तोट्यात असेल तर:मेंटेनन्समधील भ्रष्टाचारावर लगाम लावा,रिक्त पदे तात्काळ भरा,मार्ग नियोजन सुधारून तोट्याच्या फेऱ्या कमी करा,इंधन खरेदी व वापर धोरण पारदर्शक करा,पण गरीब, महिला आणि ज्येष्ठांवर गदा आणू नका. सामाजिक न्यायावर कुठलाही आघात आम्ही सहन करणार नाही. गरज पडल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

लालपरीसाठी तीन ठोस मागण्या

एसटीला अधिक चांगले दिवस आणायचे असतील तर तातडीने खालील निर्णय घ्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली –

१) पारंपारिक लालपरीला प्राधान्य द्या :

नवीन हिरव्या रंगाच्या शिवाई चार्जिंग गाड्या भाडेतत्त्वावर घेण्याचे धोरण थांबवावे. पारंपारिक लालपरी बस खरेदी करून सेवा टिकवावी, जेणेकरून सवलती आणि सुविधा कायम राहतील.

२) छउचउ स्मार्ट कार्ड सर्वांसाठी परवडणारे करा :

सध्याची स्मार्ट कार्ड योजना सर्वसामान्य प्रवाशांना परवडणारी नाही. रोज किंवा आठवड्यातून एकदा प्रवास करणाऱ्यांसाठी कमी किमतीत उपलब्ध करून द्यावी.

३) खाजगी बसेसचा वापर त्वरित थांबवा :

विशिष्ट कंपन्यांना फायदा होईल अशा खाजगी तत्त्वावरील बसेसचा वापर बंद करावा. या धोरणामुळे एसटी आर्थिक अडचणीत सापडली असल्याचा आरोप त्यांनी केला.

एसटी वाचवा, महिला सन्मान वाचवा, ज्येष्ठांचा अधिकार वाचवा हे आमचे धोरण आहे. सवलती बंद करण्याचा कोणताही प्रयत्न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा ठाम इशारा नितीन जायभाये यांनी दिला आहे.ग्रामीण महाराष्ट्राच्या जीवनवाहिनीवर घाला घालणारे निर्णय सरकारने त्वरित मागे घ्यावेत, अशी जोरदार मागणी आता सर्व स्तरांतून पुढे येत आहे.

# नांदेड जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

नांदेड । संदीप कदम बामणीकर

नांदेड जिल्ह्यात २६ फेब्रुवारीचे सकाळी ६ वाजेपासून ते १२ मार्च २०२६ रोजीच्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात २६ फेब्रुवारीचे सकाळी ६ वाजेपासून ते १२ मार्च २०२६ रोजीच्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा




अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

# पंतप्रधान मोदी इस्रायल दौ–यासाठी रवाना

## बेंजामिन नेतान्याहू यांच्याशी होणार मैत्री पूर्ण चर्चा

नवी दिल्ली : भारत आणि इस्रायलमधील संबंधांना एका नव्या उंचीवर नेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी ९ वर्षांनंतर पुन्हा एकदा इस्रायलच्या दोन दिवसीय (२५-२६ फेब्रुवारी) दौ–यासाठी रवाना झाले आहेत. या दौ–यामुळे दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी अधिक मजबूत होईल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला आहे. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या विशेष निमंत्रणावरून हा दौरा होत असून जगभरातील राजनैतिक तज्ज्ञांचे लक्ष याकडे लागले आहे.



विमानातून रवाना होण्यापूर्वी पंतप्रधान मोदींनी सोशल मीडिया आणि प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले माझे प्रिय मित्र बेंजामिन नेतान्याहू यांच्या निमंत्रणावरून मी या ऐतिहासिक दौ–यावर जात आहे. गेल्या काही वर्षांत भारत आणि इस्रायलमधील सहकार्य वेगाने वाढले आहे. मला खात्री आहे की, ही भेट दोन्ही देशांतील संबंधांना अधिक बळकटी देईल आणि भविष्यातील नवीन उद्दिष्टे ठरवेल. पंतप्रधान मोदी या दौ–यात इस्रायलच्या संसदेला म्हणजेच नेसेटला संबोधित करणार आहेत. असा बहुमान मिळवणारे ते पहिलेच भारतीय पंतप्रधान ठरतील. याबद्दल बोलताना मोदी म्हणाले की इस्रायलच्या संसदेत बोलण्याची संधी मिळणे हा दोन्ही देशांमधील मजबूत लोकशाही मूल्यांचा सन्मान आहे. मी केवळ राष्ट्रपती आयझॅक हर्झोग आणि पीएम नेतान्याहू यांनाच भेटणार नाही, तर तेथे राहणा–या भारतीय समुदायाशीही संवाद साधणार आहे.

दहशतवादाविरोधात झिरो टॉलरन्स

पंतप्रधानांच्या या दौ–याच्या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांच्या प्रतिनिधींमध्ये उच्चस्तरीय चर्चा झाली. यामध्ये दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी 'झिरो टॉलरन्स' धोरणावर शिक्कामोर्तब करण्यात आले. माहितीची देवाणघेवाण आणि तांत्रिक सहकार्य वाढवून जागतिक दहशतवादाला पायबंद घालण्याचा संकल्प दोन्ही देशांनी केला आहे. भारत आणि इस्रायलमधील ही ग्रँड दोस्ती येणा–या काळात आशियाई राजकारणात नवी समीकरणे मांडणार, हे निश्चित मानले जात आहे.


# २० मार्चपूर्वी जिल्हा परिषद अध्यक्ष व पंचायत समिती सभापतींची निवडणूक

## ग्रामविकास विभागाचे जिल्हाधिका–यांना आदेश

मुंबई : प्रतिनिधी

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या अध्यक्षपद व सभापतीपदाच्या निवडणुका २० मार्चपूर्वी होणार आहेत. ग्रामविकास विभागाने याबाबतचे आदेश जारी केल्याने आता राजकीय घडामोडींना व राजकीय समीकरणाच्या मांडणीला वेग येणार आहे.

राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणा–या १२५ पंचायत समित्यांची निवडणूक ७ फेब्रुवारी रोजी होऊन ९ फेब्रुवारीला निकाल जाहीर झाले आहेत. परंतु जिल्हा परिषद अध्यक्षांची, तसेच पंचायत समित्यांच्या सभापती पदांची निवडणुक कधी होणार याबाबत उत्सुकता होती. अखेर ग्रामविकास विभागाने गुरुवारी याबाबतचे आदेश जारी करून २० मार्चपूर्वी पहिली बैठक घेण्याचे निर्देश जिल्हाधिका–यांना दिले आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम मधील कलम ११(१) व ५९(१) नुसार निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाळ हा पहिल्या बैठकीपासून सुरू होतो.



समीकरणाची जुळवाजुळव सुरू

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, धाराशीव, लातूर आणि परभणी या १२ जिल्ह्यापरिषदांची निवडणूक झाली आहे. यातील अनेक जिल्हा परिषदांमध्ये कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. त्यामुळे महाविकास आघाडी व महायुतीमध्ये सत्तेसाठी वेगवेगळी समीकरणं तयार झाली आहेत. सत्ताधारी महायुतीतील तीन पक्षही अनेक ठिकाणी एकमेकांविरोधात उभे आहेत. त्यामुळे कुठे कोणाचे समीकरण जुळणार व कोण बाजी मारणार याची उत्सुकता आहे.

# सुनेत्रा पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष होणार

पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची आज बैठक

मुंबई : प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड केली जाणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक गुरुवारी सायंकाळी वरळी डोम येथे होणार असून या बैठकीला राष्ट्रीय कार्यकारिणी सर्व सदस्य,राज्याचे प्रदेशाध्यक्ष, आमदार, खासदार खासदार) उपस्थित असतील.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली आहे. पक्षाचे अध्यक्षपदही त्यांनीच स्वीकारावे अशी विनंती पक्षाच्या जेष्ठ नेत्यांनी आणि आमदारांनी केली होती. त्यानुसार उद्या मुंबईत राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक बोलावण्यात आली आहे.

कार्यकारी अध्यक्ष म्हणून प्रफुल्ल पटेल हे राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या संदर्भातील प्रस्ताव हा बैठकीत मांडतील. या प्रस्तावाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील वरिष्ठ नेते अनुमोदन देतील आणि त्यानंतर सर्वानुमते सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड होईल. निवडणूक आयोगाच्या अधिका–यांच्या देखरेखीमध्ये ही सगळी प्रक्रिया पार पडेल.



पार्थ पवार यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब

राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीच्या बैठक मंगळवारी रात्री पार पडली. या बैठकीत राज्यसभेच्या निवडणुकीसाठी अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्या उमेदवारीवर औपचारिक शिक्कामोर्तब करण्यात आले. अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक सुनेत्रा पवार या लढवणार आहेत. त्यांच्या राज्यसभेच्या जागेसाठी जेव्हा निवडणूक लागेल तेव्हा त्याबाबतचा निर्णय घेतला जाणार आहे.

# राज्यसभेत निवडून जाणार हे माहिती, पण लोकसभा लढण्याची इच्छा

रामदास आठवले यांचे स्पष्ट वक्तव्य

परभणी : मी राज्यसभेवर जाणार हे मला आधीच माहीत आहे, मात्र लोकसभा निवडणूक लढवण्याची माझी इच्छा आहे, असं स्पष्ट वक्तव्य केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केली.भाजपकडून राज्यसभा उमेदवारी निश्चित झाल्यानंतर आठवले यांनी विजयाचा आत्मविश्वास व्यक्त केला. तसेच महाविकास आघाडीत काही बिघाड झाला तर सातवी जागाही आम्ही जिंकू, असा दावा केला. परभणीतील पत्रकार परिषदेत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी राज्यसभा उमेदवारीवर पहिली प्रतिक्रिया दिली.



येत्या १६ मार्च रोजी राज्यसभेच्या सात जागांसाठी महाराष्ट्रात निवडणूक होणार आहे. संख्याबळानुसार, महायुतीचे सहा खासदार सहज निवडून जातील, तर महाविकास आघाडीकडून एक खासदार निवडून जाणार आहे.

भाजपच्या वाट्याला राज्यसभेच्या चार जागा येणार असून त्यामध्ये केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना संधी मिळणार आहे. त्याचसोबत भाजपचे केंद्रीय नेते विनोद तावडे यांचेही नाव राज्यसभेसाठी चर्चित आहे. राज्यसभा निश्चित असली तरी लोकसभेची इच्छा कायम असल्याचं स्पष्ट करत रामदास आठवले यांनी आगामी राजकीय घडामोडींना वेगळं वळण देण्याचे संकेत दिले आहेत.

# बारामती पोलीस स्टेशनमधील ब्लॅक बॉक्सचा फोटो व्हायरल

## अजितदादांच्या अपघातावरून पुन्हा चर्चांना उधाण

पुणे : अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर सापडलेला ब्लॅक बॉक्स बारामती तालुका पोलीस स्टेशनमध्ये ठेवण्यात आला होता. विशेष म्हणजे, -ळीलीरषीं -ललळवशपीं खप-ींशीींळसरींळेप ईीशरी म्हणजेच --खइ चे अधिकारी के. रामचंद्रन यांनी २९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २ वाजता हा ब्लॅक बॉक्स पोलीस ठाण्यात ठेवला होता. फक्त ब्लॅक बॉक्सच नाहीतर विमानाचे इतरही पार्ट पोलीस ठाण्यात ठेवले होते. आता हा ब्लॅक बॉक्स सुरक्षित होता का हे मात्र समजू शकले नसले तरी यामुळे विविध चर्चांना उधाण आले आहे.




राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी विमान अपघातात निधन झालं. त्यानंतर त्यांच्या अपघातावर शंका उपस्थित केली जाऊ लागली. त्यांचे पुतणे आणि आमदार रोहित पवारांनी यावर व्हीएसआर कंपनीवर आरोप केले. त्याचसोबत राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनीही अजित पवारांच्या अपघातामागे घातपात असल्याचा संशय व्यक्त केला.दरम्यान, अजित पवारांच्या अपघाती विमानाचा ब्लॅक बॉक्स तपास यंत्रणांच्या हाती लागला. परंतु हा ब्लॅक बॉक्स जळालेल्या अवस्थेत असल्याचं तपास यंत्रणांनी सांगितलं. त्यामुळे त्यावर अनेक शंका उपस्थित केल्या गेल्या.

# टीईटी नापास गुरुजींना मोठा झटका!

## पदोन्नती विसरून जा, हायकोर्टाचा आदेश

बीड /प्रतिनिधी

टीईटी पास नसलेल्या अपात्र शिक्षकांना हायकोर्टात मोठा झटका बसला आहे. शिक्षकांच्या पदोन्नती यादीत नाव समाविष्ट करण्याच्या याचिकांमध्ये टीईटी अर्हता निर्णायक ठरली आहे. टीईटी पात्रता नसलेल्या शिक्षकांना पदोन्नतीसाठी विचार करता येणार नाही, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. त्या अंतरिम आदेशानुसार झालेली पदोन्नतीची कार्यवाहीही न्यायालयाने अवैध ठरवली. मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठाने २० फेब्रुवारीचा अंतरिम आदेश मागे घेतला आहे. टीईटी नसलेल्या शिक्षकांना पदोन्नती नाही असे या निकालाने अधोरेखित झाले आहे. शिक्षकांच्या पदोन्नती यादीत नाव समाविष्ट करण्याच्या याचिकांमध्ये टीईटी अर्हता निर्णायक ठरली आहे.





नागपूर खंडपीठातील याचिकाकर्ते शिक्षक टीईटी पात्र होते. मात्र त्यांच्या नावांचा पदोन्नती यादीत समावेश झालेला नव्हता. औरंगाबाद खंडपीठातील याचिकांमधील शिक्षकांकडे टीईटी पात्रता नव्हती. त्यामुळे त्यांना पदोन्नतीचा लाभ देता येणार नाही,असा निष्कर्ष न्यायालयाने काढला. न्या. किशोर सी. संत आणि न्या. सुशील एम. घोडेस्वार यांच्या खंडपीठासमोर प्रकरणात सुनावणी झाली. या निर्णयामुळे पदोन्नती प्रक्रियेत टीईटी अर्हतेचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले.

# दोन हजार मराठी शाळा अडचणीत, ६२० शाळा बंद होणार

## २५ हजार शिक्षकांच्या नोकरीवर टांगती तलवार?

महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण क्षेत्रातली एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरही राज्यातील मराठी शाळांचं अस्तित्वच सध्या धोक्यात असल्याचं भीषण वास्तव समोर आलं आहे.

पटसंख्या कमी असल्याच्या कारणावरून राज्यातील २५५ मराठी शाळा बंद करण्यात आल्याची माहिती सरकारकडून देण्यात आली आहे.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून राज्यातील मराठी शाळांच्या भीषण परिस्थितीवर भाष्य करणारी एक पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे. यात त्यांनी राज्य सरकारच्या शैक्षणिक धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.




सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारनं महाराष्ट्रातील पालकांचा कल इंग्रजी शाळांकडे वाढत असल्यानं मराठी शाळा बंद पडत असल्याची स्थिती सभागृहात कबूल केल्याचं नमूद केलं आहे. राज्यातील तब्बल २५५ शाळा मागील दोन वर्षांत बंद पडल्या आहेत.महाराष्ट्रातच मराठी भाषेच्या शाळांची ही स्थिती होणे अतिशय गंभीर आणि खेदजनक असल्याचं सुळे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

एकीकडे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला तर दुसरीकडे शिक्षणाच्या परिघातून मराठी भाषा हळूहळू दूर होतेय असे चित्र दिसते. अभिजात भाषेच्या विकासासाठी केंद्र शासनाच्या माध्यमातून मिळणारा निधी मराठी भाषेतून शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी वापरता येऊ शकतो. शासनाने याबाबत गांभीर्याने विचार करुन मराठीतून शिक्षण अधिकाधिक दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण करण्यासाठी काम करावे. मराठी भाषेची पताका फडकवत ठेवण्यासाठी हे आवश्यक असल्याचं मतही सुळे यांनी आपल्या पोस्टमधून व्यक्त केलं आहे.

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारने लेखी प्रश्नोत्तरात राज्यातील मराठी शाळांच्या सद्यस्थितीची माहिती दिली. सरकारकडे विचारणा करताना राज्यात कमी पटसंख्येमुळे २ हजार मराठी शाळा अडचणीत आल्या असून त्यापैकी ६२० शाळा बंद होणार असल्याने २५ हजार शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत. कोकण विभागात ७००, विदर्भात ८०० हून अधिक, पश्चिम महाराष्ट्रात ७०० हून अधिक, मराठवाड्यात ४००, उत्तर महाराष्ट्रात ३०० हून अधिक मराठी शाळा बंद होण्याच्या स्थितीत आहेत.

# राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती साजरी

बीड (प्रतिनिधी)

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. २३ फेब्रुवारी रोजी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्राचार्य प्रो. डॉ. संतोष उंदरे यांच्या हस्ते राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रो. डॉ. बाबासाहेब कोकाटे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. वृशाली कुटे, डॉ. बी.डी.जाधवर, डॉ. सविता सुक्ते, डॉ. सुचिता खामकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.




# आंबेवडगाव परिसरात जोरदार अवकाळी पाऊस

किल्ले धारूर (प्रतिनिधी )

धारूर तालुक्यात सोमवारी गांजपूर, चिंचपूर, गवंदरा आंबेवडगाव परिसरात मोठा जोरदार अवकाळी पाऊस झाला. या अवकाळी पावसाने फळांसह गहू, ज्वारी, हरभरा पिकांना मोठा फटका बसला आहे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान या अवकाळी पावसामुळे झालेले आहे.

काल सोमवारी दुपारी तीन ते चार दरम्यान मोठ्या प्रमाणावर अवकाळी पाऊस झाला. विजेच्या कडकडंसह जोरदार पावसाने हजेरी लावली होती यामुळे धारूर तालुक्यातील ज्वारी, गहू हरभरा उभे असलेले पीक अक्षरशः आडवे झाले आहे यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे हाथा तोंडाशी आलेला घास निसर्गाने पुन्हा एकदा हिरावला आहे. आंबा या पिकाचे ही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नुकसानीचा पंचनामा करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी होऊ लागली आहे.



# पवित्र पोर्टल मार्फत निवड झालेल्या नवनियुक्त शिक्षकांची पदस्थापना रखडली

## शिक्षकांना तात्काळ पदस्थापना देण्यात यावी: शेख इरशान

शासनाने बीड जिल्हा परिषदेसाठी भरती प्रक्रिया राबवून पवित्र पोर्टलमार्फत ६ उमेदवारांची निवड केली होती. मात्र निवडीनंतर तब्बल सहा महिने उलटून गेले तरी अद्याप या शिक्षकांना पदस्थापना देण्यात आलेली नाही. यामुळे नवनियुक्त शिक्षकांमध्ये तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. सदरील शिक्षकांना शाळांवर काम करण्यासाठी तात्काळ पदस्थापना देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटनेने जिल्हा परिषदचे सीईओ आणि शिक्षणाधिकारी यांना केली आहे.

संघटनेच्या सह सचिव शेख इरशान यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यात उर्दू माध्यमाच्या प्राथमिक शिक्षकांची आधीच मोठी कमतरता आहे. अनेक शाळांमध्ये शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर विपरीत परिणाम होत आहे. तरीही निवड झालेल्या शिक्षकांना अद्याप पदस्थापना मिळत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे म्हणून या शिक्षकांना तात्काळ समुपदेशन घेऊन पदस्थापन देण्यात यावे. यामुळे जिल्ह्यातील उर्दू माध्यमाच्या शाळांमधील शिक्षक टंचाई दूर होईल आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता येईल.

# मनपात सभापती, स्विकृतसाठी लॉबिंग! ;कोणाकोणाला मिळणार संधी

## गुरुवारी स्थायी समिती, महिला बालकल्याण समिती सदस्य, स्वीकृत नगरसेवकांच्या निवडी

अहिल्यानगर । प्रशांत बाफना

महापालिकेत स्वीकृत नगरसेवक निवडीच्या हालचालींना वेग आला असून, इच्छुकांनी जोरदार फिल्डिंग लावली आहे. गटनेत्यांकडून बंद पाकिटात नाव दिले जाणार असून, गुरुवारी होणार्या महापालिकेच्या विशेष सभेत पाकिट उघडल्यानंतर कोणाला लॉटरी लागली हे समजणार आहे. राष्ट्रवादीला तीन, भाजपला दोन तर शिवसेनेला एक स्वीकृत सदस्याची जागा मिळणार आहे.

महापालिकेची पहिली सर्व साधारणसभा २६ फेब्रुवारी रोजी सकाळी होणार आहे. पहिल्याच सभेमध्ये स्थायी समिती सदस्य निवड, महिला व बालकल्याण समिती सदस्य निवड आणि स्वीकृत नगरसेवकाच्या निवडी होणार आहेत. स्थायी समिती १६ व महिला व बालकल्याण समितीसाठी १६ सदस्यांची निवड होणार आहेत. त्यासाठी गटनेते सदस्यांच्या नावाची शिफारस करणार आहेत. दुसरी सर्वसाधारण सभा महापौर ज्योती गाडे यांच्या अध्यक्षतेखाली लगेचच दुपारी होणार आहे. या सभेत स्वीकृत नगरसेवकांची निवड होणार आहे. स्वीकृत नगरसेवक पदासाठी भाजप, राष्ट्रवादीच्या इच्छुकांची चांगलीच फिल्डिंग लावली आहे.

राष्ट्रवादीमध्ये आमदार संग्राम जगताप ठरवतील त्या उमेदवाराला स्वीकृत नगरसेवकपदाची संधी मिळणार आहे. आमदार जगताप विधानसभेच्या अधिवेशनासाठी मुंबईत आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीची स्वीकृत सदस्यांची नावे मुंबईतून फायनल होण्याची शयता आहे.भाजपमध्ये माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील ठरवतील त्याच उमेदवाराला स्वीकृत नगरसेवकाची लॉटरी लागणार आहे. निवडणुकीत भाजपने अनेक विद्यमान नगरसेवक पदाधिकार्यांना थांबवत नवख्यांना उमेदवारी दिली. त्यामुळे यातून कोणाला संधी मिळणार हे सभागृहात समजणार आहे. शिवसेनेच्या वाट्याला एक जागा येणार असून, या एका जागेसाठी अनेक जण इच्छुक आहेत.

स्वीकृतसाठी चर्चेतील नावे

प्रा. माणिक विधाते, अनिल शिंदे, विकास जगताप, दत्ता जाधव, रवी वाकळे, दगडूमामा पवार, शैलेश मुनोत, योगेश सोनवणे, रविंद्र बारस्कर, विशाल नाकाडे, रणजीत परदेशी, सचिन बोरुडे यांची नावे चर्चेत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस ३, भाजप २, शिंदे सेना १ स्विकृत नगरसेवक निवडला जाणार आहे. आमदार संग्राम जगताप व माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या गुडबूकमध्ये असणार्यांनाच संधी मिळणार असल्याचे सांगितले जात आहे. शिवसेनेकडून स्विकृतमधून कोणाला संधी मिळते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील लोकशाही मूल्यांची रुजुवात करूया -प्रो.डॉ.मनोहर सिरसाट

## बीडमध्ये राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक ग्रंथालयात शिवजयंती उत्साहात साजरी

स्वराज्यात खरी लोकशाही नांदत होती. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमाचे प्रतीक नव्हते, तर ते रयतेच्या कल्याणासाठी अखंड झटणारे लोकाभिमुख राजे होते. त्यांनी अठरा पगड जातींना एकत्रित करत धर्मनिरपेक्ष, मानवतावादी आणि लोककल्याणकारी शासनरचना उभारली.शेतकरी, महिला आणि सर्वसामान्य प्रजेच्या जीवनाला प्रतिष्ठा प्राप्त करून देत त्यांनी समताधिष्ठित राज्यव्यवस्था निर्माण केली. स्वराज्य हे केवळ राजसत्तेचे प्रतिक नव्हते, तर ते लोकसहभागातून घडलेले जनराज्य होते. शिवकार्य हे माझेच कार्य आहे अशी समर्पण भावना प्रत्येक मावळ्याच्या मनामध्ये चेतविण्याचे अद्वितीय कार्य शिवरायांनी केले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सामर्थ्य आणि नैतिकता यांचा अद्वितीय संगम होतसामर्थ्याला नैतिकतेची जोड आणि नैतिकतेला सामर्थ्याचा आधार - हाच स्वराज्यनिर्मितीचा मूलाधार ठरला. आजच्या सामाजिक-राजकीय संदर्भातही शिवकालीन आदर्श अधिकाधिक कृतीप्रवण करण्याची आवश्यकता आहे,असे मत

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते बलभीम महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रोफेसर डॉ.मनोहर सिरसाट यांनी आपल्या विचारप्रवर्तक भाषणात ठामपणे अधोरेखित केले.कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक ग्रंथालय, बीड येथे दि. १९ फेब्रुवारी २०२६, गुरुवारी सकाळी ११:३० वाजता अभिवादनाचा समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण आणि वैचारिक वातावरणात संपन्न झाला. हा कार्यक्रम केवळ जयंतीपुरता मर्यादित न राहता स्वराज्याच्या लोकशाही तत्त्वांचा पुनर्जागर करणारा ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात कु.अनघा सिरसाट हिने सादर केलेल्या चाकर शिवबांचं होणारं या ओजस्वी व भावस्पर्शी गीताने झाली. गीताच्या



स्वरांमधून शिवभक्ती, स्वराज्यनिष्ठा आणि समर्पणभाव यांचे सशक्त दर्शन घडले. व उपस्थितांमध्ये स्वाभिमानाची भावना जागृत झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉम्रेड. नामदेव चव्हाण (सचिव मंडळ सदस्य, भारतीय कम्युनिस्ट पक्ष) विराजमान होते. त्यांनी ग्रंथालयास ५१ पुस्तकांची सदिच्छा भेट अर्पण करून ज्ञानसंवर्धनाच्या कार्याला मोलाची चालना दिली. ज्ञानदानाची ही परंपरा समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत किती आवश्यक आहे, याची प्रचीती त्यांच्या या कृतीतून दिसून आली.

प्रमुख उपस्थितीमध्ये प्रा. डॉ. अनिता शिंदे उपप्राचार्य, सौ. के. एस. के. महाविद्यालय,ह्या उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. बाळासाहेब जावळे यांनी प्रभावीपणे केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत आयु. सौरभ तुरुकमारे (ग्रंथपाल) यांनी केले.या प्रसंगी आयु. गौतम वाघमारे (ग्रामसेवक), आयु. लक्ष्मण वाघमारे (शिक्षक), कॉम्रेड. ड. भिमराव चव्हाण, फिडेल चव्हाण यांच्यासह अनेक अभ्यासू मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी व उपस्थितांनी कविता, गीत आणि भाषणांच्या माध्यमातून शिवचरित्राचा गौरवपूर्ण आढावा घेतला. कार्यक्रमाची सांगता शिवा चव्हाण यांनी सादर केलेल्या जोशपूर्ण पोवाड्याने झाली.

एकूणच, हा कार्यक्रम शिवजयंती साजरी करण्यापुरता मर्यादित न राहता स्वराज्याच्या लोकशाही मूल्यांचा, सामाजिक समतेचा आणि नैतिक शासनव्यवस्थेचा जागर करणारा ठरला. शिवरायांचे विचार आजही समाजमनाला प्रेरणा देतात, आणि याची प्रचीती या कार्यक्रमातून प्रत्ययास आली.

# बारामती पोटनिवडणूक सुनेत्रा पवार लढणार



बारामती : राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा तयारी पोटनिवडणुकीची निवडणूक आयोगाने सुरू केली आहे. या विधानसभा मतदारसंघासाठी विशेष संक्षिप्त मतदारयादी पुनरीक्षण कार्यक्रम आयोगाने जाहीर केला असून १ जानेवारी पर्यंत नाव नोंदविलेले मतदार पोटनिवडणुकीत मतदान करू शकणार आहेत. या मतदारसंघासाठी १० मार्चला अंतिम मतदारयादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तर बारामती २०२६ विधानसभेच्या पोटनिवडणुकीचा उमेदवार ठरला असल्याची माहिती समोर आली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार राष्ट्रवादीच्या कोअर कमिटीच्या बैठकीत पोटनिवडणूक लढण्यावर एकमत झाले आहे. बारामती विधानसभेची प्रारूप मतदार यादी १० मार्चला प्रसिद्ध झाल्यानंतर कोणत्याही क्षणी निवडणुकीची घोषणा होणार आहे. राष्ट्रवादी पक्षाचा निवडणूक बिनविरोध करण्यावर भर असणार आहे.

आगामी राज्यसभा निवडणुकीत पार्थ पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार असतील, असा निर्णय पक्षाकडून घेण्यात आल्याची माहिती आहे. सोमवारी रात्री मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसच्या झालेल्या पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत हा निर्णय झाल्याची माहिती आहे. सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत पार्थ पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. प्रफुल पटेल यांच्या निवासस्थानी ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

# राज्यसभेच्या ४ जागांसाठी भाजपकडून २५ नावे

मुंबई : राज्यसभा निवडणुकीसाठी प्रदेश भाजपच्या कोअर कमिटीने संभाव्य २५ नावांची एक यादी केंद्रीय भाजपकडे पाठविण्याचा निर्णय मंगळवारी रात्री उशिरा मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत घेतला.

यामध्ये भाजप राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, डॉ. भागवत कराड, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर, डिक्कीचे अध्यक्ष मिलिंद कांबळे, माजी आमदार कुणाल पाटील, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, माजी राज्यमंत्री दिलिप कांबळे, भाजपचे नेते माधव भंडारी, माजी खासदार अमर साबळे, माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, माजी खासदार प्रीतम मुंडे, पुसदच्या डॉ. संगीता फुसाटे आदींचा समावेश आहे.केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा राज्यसभा सदस्यत्वाचा कार्यकाळ संपत असल्याने भाजपच्या वाट्याला येणार्या चारपैकी एक जागा त्यांना



दिली जाईल असे मानले जात आहे. मात्र, मित्रपक्षाच्या नेत्याच्या नावाची शिफारस करणे हा विषय प्रदेश कोअर कमिटीच्या अखत्यारित येत नसल्याने याबाबतचा निर्णय केंद्रीय भाजपच घेईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, रावसाहेब दानवे, चंद्रशेखर बावनकुळे, सुधीर मुनगंटीवार, पंकजा मुंडे, गिरीश महाजन, अतुल सावे, आशिष शेलार, अमित साटम हे कोअर कमिटी बैठकीस उपस्थित होते.

# अनिल अंबानींना ईडीचा जबरदस्त दणका!

## ३७१६ कोटींच्या आलिशान घरावर टाच

मुंबई: सक्तवसुली संचलनालयानं (ईडी) मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात रिलायन्स समूहाचे चेअरमन अनिल अंबानी यांना मोठा दणका दिला आहे. ईडीनं अनिल अंबानी यांच्या मालकीच्या मुंबईतील १७ मजली आलिशान निवासस्थानावर टाच आणली आहे.

अंबानी यांच्या मालकीच्या 'अबोड'वर जप्तीची कारवाई झाली आहे. या घराचं मूल्य तब्बल ३ हजार ७१६ कोटी रुपये आहे. अनिल अंबानी यांच्या समूहातील रिलायन्स कम्युनिकेशन्सशी संबंधित बँक फसवणूक प्रकरणात ईडीनं कारवाई केली आहे. उच्चपदस्थ सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबईच्या पाली हिल परिसरात असलेल्या आलिशान इमारतीवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. पीएमएलएच्या अंतर्गत ही कारवाई करण्यात आलेली आहे. या कारवाईमुळे जप्त करण्यात आलेल्या मालमत्तांचं एकूण मूल्य १५,७०० कोटी रुपयांवर पोहोचलं आहे. ६६ वर्षीय अनिल अंबानी यांची या प्रकरणात दुसऱ्यांदा चौकशी होण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीनं ईडींची तयारी सुरु केली आहे. ऑगस्ट २०२५ मध्ये अनिल अंबानी पहिल्यांदा ईडीसमोर हजर झाले होते. तिथे पीएमएलएच्या अंतर्गत त्यांचा जबाब नोंदवण्यात आला. आर कॉममधील कथित आर्थिक अनियमितता आणि कर्जातील हेराफेरी प्रकरणात ईडीनं अनिल अंबानी यांच्या मालकीच्या आलिशान इमारतीवर टाच आणली आहे. सीबीआयनं एफआयआर दाखल केल्यावर ईडीनं ही कारवाई केली आहे. अनिल अंबानी यांच्या मालकीच्या कंपन्यांवर





फसवणूक, लाचखोरी आणि सार्वजनिक पैशांचा दुरुपयोग केल्याचे आरोप आहेत.

पीएमएलएच्या कलम १७ च्या अंतर्गत, रिलायन्स समूहाशी संबंधित ३५ पेक्षा अधिक मालमत्तांवर छापे टाकण्यात आले आहेत. या कारवाईचा आवाका बराच मोठा आहे. ५० पेक्षा अधिक कंपन्या चौकशीच्या फेऱ्यात अडकल्या आहेत. या प्रकरणी मुंबई आणि दिल्लीतील २५ पेक्षा अधिक जणांची चौकशी करण्यात आलेली आहे.२०१७ ते २०१९ या कालावधीत येस बँकेसाठी जवळपास ३००० कोटी रुपयांचं कर्ज घेण्यात आलं. ते पद्धतशीरपणे अन्यत्र वळवण्यात आलं, अशी माहिती प्राथमिक तपासातून समोर आली आहे. ही रक्कम शेल कंपन्यांच्या माध्यमातून फिरवण्यात आली, याचा शोध तपास यंत्रणा घेत आहेत.

# भारत-बांगलादेश दरम्यान बससेवा पुन्हा सुरु

## १८ महिन्यांपूर्वी केली होती सेवा बंद नव्या सरकारने भारतद्वेषी निर्णय बदलला



ढाका : भारत आणि बांगलादेश यांच्यातील बिघडलेले संबंध आता पुन्हा रुळावर येताना दिसत आहेत. बांगलादेशात राजकीय सत्तापालट होऊन बांगलादेश नॅशनल पार्टी सत्तेत आल्यानंतर, गेल्या १८ महिन्यांपासून बंद असलेली आंतरराष्ट्रीय मैत्री बस सेवा अखेर मंगळवार, २४ फेब्रुवारी २०२६ रोजी पुन्हा सुरू झाली. या निर्णयामुळे दोन्ही देशांतील नागरिकांना, विशेषत: ईशान्य भारतातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

ऑगस्ट २०२४ मध्ये शेख हसीना सरकार कोसळल्यानंतर बांगलादेशात निर्माण झालेल्या अस्थिरतेमुळे ही बस सेवा खंडित करण्यात आली होती. १८ महिन्यांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर कोलकाता-ढाका-आगरतळा आणि आगरतळा-ढाका-कोलकाता या मार्गांवर बस पुन्हा धावू लागली आहे. ही सेवा सुरू होणे हे दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार आणि सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. आगरतळाहून कोलकात्याला जाण्यासाठी हा मार्ग चिकन नेक पेक्षा खूपच कमी वेळेत पोहोचवतो. बांगलादेशात तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील बीएनपी सरकार सत्तेत आल्यानंतर भारतासोबतचे संबंध सुधारण्यावर भर दिला जात आहे.

# तामिळनाडूत आल्यावर मोदींचा मोठा पराभव होईल

मुख्यमंत्री एमके स्टालिन यांचा दावा



चेन्नई : तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टालिन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर पुन्हा एकदा जोरदार टीका केली आहे. पंतप्रधान केवळ निवडणुकीच्या काळातच मतदारांचा पाठिंबा मागण्यासाठी राज्यात येतात, असा आरोप करत स्टालिन यांनी म्हटले की, मोदींचे तमिळनाडूतील वाढते दौरे, हे एनडीएच्या वाढत्या पराभवाचेच संकेत आहेत.

एका कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, तुम्ही तुमचे भविष्य माझ्यावर विश्वासाने सोपवले आहे. त्या विश्वासावर खरे उतरायला मी माझ्या क्षमतेपेक्षा अधिक मेहनत घेतोय. मी सर्वांसाठी काम करतो, काहीजण फक्त निवडणुकीपुरते येतात, असा टोला स्टालिन यांनी लगावला.

एनडीएच्या पराभवाचा फरक वाढणार

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींच्या वारंवार तमिळनाडू दौऱ्यावर टीका करताना स्टालिन म्हणाले की, निवडणूक आली की पंतप्रधान येथे येतात. त्यांच्यासोबत युतीतील नेतेही येतात. पण पंतप्रधान जितक्या वेळा तमिळनाडूत येतील, एनडीए तितक्याच मोठ्या फरकाने येथे पराभूत होईल.

तमिळनाडू दिल्लीमधून नाही, चेन्नईतून चालेल

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या अलीकडील निर्णयांचा उल्लेख करत स्टालिन यांनी केंद्र सरकारवर दुजाभावाचा आरोप केला. ते म्हणाले की, गुजरातसाठी मेट्रो रेल प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली, मात्र तमिळनाडूच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. अर्थसंकल्पातही राज्यासाठी काहीच देण्यात आले नाही. तमिळनाडूवर दिल्लीमधून नव्हे, तर फोर्ट सेंट जॉर्ज (चेन्नई) येथूनच चालेल, असे स्टालिन यांनी ठामपणे सांगितले.

# केरळनंतर आता दिल्लीचेही नाव बदलणार ?

## भाजप खासदाराचे अमित शहा यांना पत्र

नवी दिल्ली : केंद्र सरकारने कॅबिनेट बैठकीत केरळ राज्याचे नाव केरळम करण्यावर शिक्कामोर्तब केले आणि आता दिल्ली, पश्चिम बंगाल या राज्यांच्या नामांतराची चर्चा सुरु झाली आहे. प्रस्ताव पाठविलेला असूनही प. बंगालचे नाव बदलण्यात आले नाही यावरून ममता यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. तर दिल्लीचे नाव बदलण्यासाठी भाजप खासदाराने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना प्रत्र पाठविले आहे.


देशाची राजधानी असलेल्या दिल्लीच्या नामांतराची चर्चा पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. दिल्लीचे प्राचीन वैभव आणि ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी शहराचे नाव बदलून 'इंद्रप्रस्थ' करण्यात यावे, अशी आग्रही मागणी भाजप खासदार राजीव खंडेलवाल यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहिले असून या मागणीमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

काय आहे खासदारांची मागणी?

खासदार राजीव खंडेलवाल यांच्या मते, दिल्लीचा संबंध पौराणिक काळातील 'इंद्रप्रस्थ' नगरीशी आहे. महाभारतात पांडवांनी वसवलेली ही नगरी सांस्कृतिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची आहे. दिल्ली हे नाव परकीय आक्रमकांच्या खुणा दर्शवते, त्यामुळे ते बदलून भारताच्या गौरवशाली इतिहासाचे प्रतीक असलेले इंद्रप्रस्थ हे नाव अधिक सयुक्तिक ठरेल, असा दावा त्यांनी पत्रात केला आहे.

# खामेनींच्या निवासस्थानावर २५० मुजाहिदीनांचा भीषण हल्ला

## सत्तापालटाचा प्रयत्न?



तेहरान : मध्य पूर्व आशियातील अत्यंत शक्तिशाली देश असलेल्या इराणमधून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचे अधिकृत निवासस्थान असलेल्या बेत-ए रहबरीवर २५० सशस्त्र मुजाहिदीनांनी भीषण हल्ला केल्याचा दावा पीपुल्स मुजाहिद्दीन या संघटनेने केला आहे. १९७९ च्या इस्लामिक क्रांतीनंतर इराणच्या सर्वोच्च नेत्याच्या घरावर झालेला हा अशा प्रकारचा पहिलाच सुनियोजित हल्ला असल्याचे बोलले जात आहे.

सोमवारी मध्य तेहरानमध्ये असलेल्या खामेनींच्या कार्यालयावर आणि घराच्या दिशेने २५० मुजाहिदीन आधुनिक शस्त्रास्त्रांसह चालून गेले. या सशस्त्र संघर्षात अनेक इराणचे सैनिक ठार झाल्याचा दावा संघटनेने केला आहे. मात्र, इराणची अधिकृत वृत्तसंस्था मेहर न्यूजने केवळ ४ जणांना अटक केल्याचे सांगत परिस्थिती नियंत्रणात असल्याचे म्हटले आहे.

# वार्ता समुहाच्या १८ व्या वर्धापन दिनी एबीपी माझाचे मुख्य संपादक राजीव खांडेकर व नामांकित उद्योजक रावसाहेब घुगे यांची प्रमुख उपस्थिती

## ७ मार्च रोजी १८ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने भूमिपुत्रांचा होणार अंबाजोगाईत सन्मान

अंबाजोगाई / प्रतिनिधी

गेल्या १८ वर्षापासुन बीड जिल्ह्यात सकारात्मक पत्रकारितेच्या माध्यमातून नावारूपास आलेले आणि समाजातील वास्तव परिस्थितीची मांडणी करून लोकाभिमुख ठरलेल्या दैनिक वार्ता समुहाचा १८ वा वर्धापन दिन सोहळा येत्या शनिवार, दि.७ मार्च २०२६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात येत आहे. वर्धापन दिनाच्या निमित्ताने जगभरात नावलौकिक प्राप्त असलेल्या एबीपी माझा मराठीचे व एबीपी हिंदी न्युजचे मुख्य संपादक राजीव खांडेकर व भारतातील प्रसिद्ध उद्योजक रावसाहेब घुगे यांची प्रमुख उपस्थित असणार आहे. तर वर्धापन दिनाच्या निमित्ताने दिल्या जाणार्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. ज्यामध्ये नगर भूषण पुरस्कार हा जळगाव येथील अप्पर पोलिस अधिक्षक अशोकराव नखाते, सदभावना पुरस्कार प्रगतशील शेतकरी व उद्योजक गौतमचंद सोळंकी यांना तर युवा गौरव पुरस्कार हा पुणे येथील युवा उद्योजक सुशिल शंकरराव गाडवे यांना जाहिर करण्यात आला. त्यासोबतच अंबाजोगाई येथील उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे व मुंबई येथील उपजिल्हाधिकारी गणेशराव पवार यांना त्यांच्या उत्कृष्ट महसुली सेवेबद्दल सन्मानित केले जाणार आहे. त्यासोबतच अंबाजोगाई शहर आणि परिसरामध्ये ज्यांनी नावलौकिक असे कार्य केले आहे. त्यांचा ही सन्मान सत्कार मान्यवरांच्या उपस्थितीत केला जाणार असल्याची माहिती वार्ता समुहाचे संपादक परमेश्वर गित्ते यांनी दिली आहे.

बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेमध्ये गेल्या १८ वर्षापासुन अखंडीत पणे व सातत्याने दैनिक वार्ता या वृत्तपत्राच्या वतीने समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील पैलुंवर प्रकाशझोत टाकण्यात येतो. त्या सोबतच सामाजिक स्तरावर काम करत असताना जे विविध घटक आहेत. त्यांना पटलावर आणून व्यवस्थेमार्फत न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. पत्रकारिता करीत असताना सामाजिक भान राखूनच प्रश्न मांडलेले आहेत. सामाजिक जाणिवा व संवेदना जपत वार्ता समुहाने सामाजिक दायित्व अदा केलेले आहे. त्यानुषंगाने १८ वर्षे पुर्ण करून १९ व्या वर्षात पर्दापण केले आहे. १८ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने यंदाही वर्धापन दिन सोहळा, जाहिर सत्कार, व पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि. ७ मार्च २०२६ रोजी अंबाजोगाई येथील मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह नगर परिषद येथे सायंकाळी ५.३० वाजता आयोजित केला आहे. या वर्धापन दिन सोहळ्यासाठी जगभरात नावलौकिक प्राप्त मराठी वृत्तवाहिनी असलेल्या एबीपी माझा व एबीपी हिंदी न्युज चे मुख्य संपादक राजीव खांडेकर तसेच भारतातील प्रसिद्ध उद्योजक आणि बाप आयटी कंपनीचे संस्थापक रावसाहेब घुगे हे प्रमुख आकर्षण असणार आहे. आणि त्यांचे विचार हे अंबाजोगाईकरांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाई पिपल्स बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी हे असणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून अंबाजोगाईचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, बृहन्मुंबई महानगर पालिकेचे उपमुख्यअभियंता इंजि.नवनाथ घाडगे पाटील, परभणी येथील कार्यकारी अभियंता इंजि.प्रसाद लांब, परळी वै.च्या नगराध्यक्षा पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, धारूरचे नगराध्यक्ष बालासाहेब जाधव, केजच्या नगराध्यक्षा सिताताई बनसोड, जिवन शिक्षण समुह केजचे संस्थापक अध्यक्ष हारूणभाई इनामदार, अभियांत्रिकी महाविद्यालय अंबाजोगाईचे प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी, केज येथील गंगामाऊली शुगरचे व्हा.चेअरमन हनुमंत मोरे, अ.भा.फिजीशिएशन असो.अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे, आयएमए अंबाजोगाईचे अध्यक्ष राहुल धाकडे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तर वार्ता समुहाच्या वतीने दरवर्षी दिले जाणारे विविध पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते केले जाणार आहे. ज्यामध्ये २०२६ चा नगरभूषण पुरस्कार हा जळगाव येथे अप्पर पोलिस अधिक्षक असलेले अशोकराव नखाते यांना जाहिर करण्यात येत आहे. अशोकराव नखाते यांचे शालेय शिक्षण अंबाजोगाईच्या भूमीतच झाले आहे. विविध शासकीय पदांवर



श्री.राजीवजी खांडेकर – प्रमुख आकर्षण | श्री.रावसाहेबजी घुगे – प्रमुख आकर्षण | श्री.अशोकराव नखाते – नगरभूषण पुरस्कार | श्री.गौतमचंद सोळंकी – सद्भावना पुरस्कार | श्री.सुशील गाडवे – युवा गौरव पुरस्कार | श्री.दिपकजी वजाळे – सेवा गौरव सन्मान | श्री.गणेशराव पवार – सेवा गौरव सन्मान

काम त्यांनी केले आहे. ज्यामध्ये ग्रामसेवक, सहाय्यक निबंधक आणि पोलिस उपअधिक्षक व आता अप्पर पोलिस अधिक्षक या पदापर्यंत त्यांची वाटचाल राहिलेली आहे. सदभावना पुरस्कार २०२६ हा अंबाजोगाई येथील प्रगतशिल शेतकरी व उद्योजक गौतमचंद सोळंकी यांना जाहिर करण्यात आला आहे. सोळंकी हे गेल्या ५० वर्षापेक्षा अधिक काळापासून अंबाजोगाई शहरामध्ये नवजीवन मशिनरी स्टोअर्सच्या माध्यमातून ग्राहक सेवेत आहेत. त्यासोबतच प्रगतशील शेतकरी म्हणून त्यांचा आवर्जुन उल्लेख केला जातो. नाविन्यपुर्ण प्रयोग हा त्यांचा छंद आहे. सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून चांगली सेवा देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. सामाजिक कार्यात सुद्धा त्यांचे योगदान आहे. बँकिंग क्षेत्रातही त्यांची वाटचाल राहिलेली आहे. युवा गौरव पुरस्कार सुशिल शंकरराव गाडवे यांना जाहिर करण्यात आला आहे. सुशिल गाडवे हे अंबाजोगाईचे भूमिपुत्र असून त्यांनी पुणे शहरामध्ये शुन्यातून विश्व निर्माण केले आहे. हजारो लोकांना त्यांच्या स्वप्नातील घरे उपलब्ध करून दिली आहेत. रिअल स्टेट व बांधकाम क्षेत्रातील यशस्वी उद्योजक म्हणून त्यांचा लौकिक आहे. त्यासोबतच अंबाजोगाई शहरामध्ये गेल्या २ वर्षापासुन उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असलेले दिपक वजाळे यांनी सामाजिक भान राखत आपली महसुली सेवा दिलेली आहे. तसेच मुंबईचे उपजिल्हाधिकारी असलेले गणेश पवार यांनीही महसुल खात्यात वेगवेगळ्या पदांवर काम करून उपजिल्हाधिकारी पदापर्यंत वाटचाल केलेली आहे. दोन्ही उपजिल्हाधिकारी महोदयांच्या सेवेचा सन्मान व गौरव म्हणून त्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित केले जाणार आहे. त्यासोबतच अंबाजोगाई शहर व तालुक्यात विविध क्षेत्रामध्ये ज्यांनी यश संपादन केले आहे. अशांचाही सत्कार या ठिकाणी केला जाणार आहे. ज्यामध्ये अंबाजोगाई येथील स्वाराती रूग्णालयाचे नेत्ररोग विभाग प्रमुख डॉ.ज्ञानोबा दराडे, नेत्ररोग तज्ञ डॉ.एकनाथ शेळके, स्वाराती रूग्णालयातील सर्जन डॉ.नितीन चाटे, मधुमेहतज्ञ डॉ.अतुल शिंदे, मिसेस महाराष्ट्र स्पर्धेच्या उपविजेत्या डॉ.सुनिता गणेश तोंडगे, पोलिस निरिक्षक शरद जोगदंड, इंजि. वरद सत्येंद्र बर्दापुरकर, ज्ञानदिप अॅकॅडमीचे संचालक प्रा.दत्ता दराडे यांचा समावेश आहे.

तर कार्यक्रमाच्या प्रारंभी सांस्कृतिक कार्यक्रमात महागायक सुभाष शेप,आसाराम जोशी, प्रदिप चोपने, शाहीर गणेश मामा काळे व इतरांचा सहभाग असणार आहे. तरी कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिक-बंधु -भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वार्ता समुहाचे संपादक परमेश्वर गित्ते, अंबाजोगाई तालुका पत्रकार संघ, तालुका पत्रकार संघ अंबाजोगाई, अ.भा.मराठी पत्रकार परिषद, अंबाजोगाई, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ अंबाजोगाई, अ.भा.मराठी डिजीटल पत्रकार संघ, अंबाजोगाई, गुडमॉर्निंग ग्रुप, अंबाजोगाई , व्हाईस ऑफ मिडीया शाखा अंबाजोगाई यांनी केले आहे.

# अधर्म-अन्यायाविरुद्ध मानवतेसाठी लढलेल्या गुरु तेग बहादुर साहिबांना नमन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अधर्म व अन्यायाच्या विरोधात उभे राहत मानवतेची रक्षा करणारे, शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या महान शौर्य, बलिदान व अटूट समर्पणाला अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने विशेष राज्यस्तरीय समागमाचे आयोजन करण्यात आले आहे. या समागमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अखिल भारतीय बंजारा क्रांती दलाचे राष्ट्रीय महासचिव शरद राठोड यांनी केले आहे.

हा गौरवशाली समागम दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत ओवे मैदान, सेक्टर २९, खारघर, नवी मुंबई येथे संपन्न होणार आहे. कार्यक्रमाच्या माध्यमातून गुरु तेग बहादुर साहिबांनी धर्मस्वातंत्र्य, सत्य, न्याय व मानवतेसाठी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाची आठवण करून देण्यात येणार आहे.राठोड पुढे म्हणाले की, गुरु तेग बहादुर साहिबांचे बलिदान केवळ एका धर्मापुरते मर्यादित नसून ते संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे उभे राहण्याची ताकद त्यांच्या विचारांतून मिळते. आजच्या काळात सामाजिक सलोखा, बंधुता व न्यायाची मूल्ये अधिक बळकट करण्यासाठी या समागमात सर्व समाजघटकांनी सहभागी होणे गरजेचे आहे.

या राज्यस्तरीय समागमात विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, गुरु साहिबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात येईल. सर्व धर्मीय नागरिक, युवक-युवती, सामाजिक कार्यकर्ते व कुटुंबीयांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महान शौर्यगाथेचे भागीदार व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील सोमवारी झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीचे पंचनामे करून

# शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी - जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण

अखिल भारतीय मराठा महासंघाचे अपर जिल्हाधिकारी यांना निवेदन

अंबाजोगाई (प्रतिनिधी) उमेश शिंदे

अंबाजोगाई तालुक्यात सोमवारी झालेल्या आवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतातील काढणीस आलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसानीचे पंचनामे करून शासनाने शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी व तालुक्यातील शेतकऱ्यांनी अपर जिल्हाधिकारी यांना बुधवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष आ.नरेंद्र पाटील व विभागीय अध्यक्ष गोपाळराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी रोजी




दिलेल्या निवेदनातून एका अत्यंत महत्त्वाच्या विषयाकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. जिल्हाध्यक्ष चव्हाण यांनी बुधवारी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अंबाजोगाई तालुक्यातील मुडेगाव, सुगाव, नांदगाव, अपेगाव, धानोरा (खूर्द), सोमनाथ बोरगाव, हिवरा (खूर्द), माकेगाव, कोळकानडी, वरपगांव, लोखंडी सावरगाव यासह अनेक गावांत सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ ते ३.३० सुरू झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वाऱ्यासह गारपीट होऊन शेतकऱ्यांच्या रब्बी हंगामातील पिकांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. या पिकांत प्रमुख्याने ज्वारी, हरभरा, गहू तसेच काही ठिकाणी फळभाज्या आणि फळबागेतील आंबा, चिक्कू, द्राक्षे, पपई या फळ पिकांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अवकाळी पाऊस, वादळी वाऱ्यासह गारपीटमुळे शेतकऱ्यांच्या पिकांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना शासनाने तात्काळ सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी व पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी अपर जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. सदरील निवेदनाच्या प्रती माहितीस्तव तहसीलदार, अंबाजोगाई आणि तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग, अंबाजोगाई यांना देण्यात आलेल्या आहेत. सदरील निवेदनावर बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण, जहाँगीर पठाण, विलास धुमाळ, दादाहरी केकाण, ओमकार चव्हाण, दयानंद गुजर, सचिन राऊत यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ऊसतोड कामगार एकाच कुटुंबातील दोन व्यक्तीचा मृत्यू

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील ब्राह्मगाव येथे ऊसतोड कामगार मुलाचा आणि बापाचा मृत्यू एकापाठोपाठ एक आघात झाल्याने या कांबळे कुटुंबाची माहिती कळताच मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोक (आबा) डक यांनी कांबळे परिवारांच्या घरी जाऊन सांत्वन भेट दिली व त्यांना तात्काळ श्री.सिताराम अर्बन को.ऑप. क्रेडीट सोसायटी लि. या बँकेत सौ.गंगुबाई रामभाऊ कांबळे यांच्या नावे २०,००० रुपयांची एफडी करून दिली व आम्ही तुमच्या पाठीशी सर्वजण उभा आहोत असा अशोक (आबा) डक यांनी धीर दिला.यावेळी प्रमुख उपस्थित मानवी हक्क अभियान तालुकाध्यक्ष मधुकर कांबळे, जिल्हाध्यक्ष सोशल मीडिया समन्वयक तथा उपाध्यक्ष बीड जिल्हा काँग्रेस कमिटी मा.वी.सुधाकर कांबळे, अशोक कांबळे ग्रुप मेन,रमेश जाधव, लखन कांबळे माजी.सरपंच भगवान गायकवाडमाझी उपसरपंच तथा ऊसतोड का.सा.प्र.अध्यक्ष अनिल



राधे कांबळे, अंजन कांबळे,पत्रकार मच्छिंद्र भाऊ उफाडे, पत्रकार सुनील थोरात माणिक कांबळे, किरण कांबळे, विक्रांत कांबळे, भास्कर कांबळे, लखन दासु कांबळे, अनिकेत कांबळे, प्रशांत कांबळे, अरुण कांबळे, दादा कांबळे, संग्राम कांबळे, छोटु कांबळे, दादा कसबे, गणेश कांबळे, ज्ञानेश्वर कांबळे, गुड्डू कांबळे, बाळू कांबळे, पांडुरंग कांबळे, मामू व असंख्य गावकरी मंडळी आणि महिला उपस्थित होत्या

## खंदारे गुरुजींची गुरुवचने





डॉ संगिता पिंगळे
बीड

तो परीक्षा घेतो, परीक्षा घेण्यासाठी नव्हे तर आदर्श निर्माण करण्यासाठी

तो परीक्षा घेतो, परीक्षा घेण्यासाठी नव्हे तर आदर्श निर्माण करण्यासाठी असे गुरुजी म्हणाले. विद्यालयात अगदी पहिल्या वर्गापासून वर्षाच्या शेवटी परीक्षा घेतली जाते आणि त्यानुसार गुणवत्ता ठरते. गुरुजींच्या विद्यालयात नेहमी सज्ज रहाव लागत .जसा अभ्यास पूर्ण केलेला विद्यार्थी कधीही परीक्षा घेतली तरी चांगले गुण मिळवितो. तसेच इथे अचूक जगण्याची नित्य पराकाष्ठा आहे. कधी कोणती घटना, समस्या, प्रसंग हे परीक्षा रूपाने प्रभू किंवा गुरू उपस्थित करतील ते निश्चित नाही. परंतु त्यात पूर्ण खरे उतरल्यास ते सर्व परीक्षा घेण्यासाठी नव्हते तर एक आदर्श साधक जीवन घडविण्यासाठी होते याचा अनुभव येतो हे निश्चित आहे. अन प्रभू किंवा गुरूच्या नियोजनाचा आपण एक भाग आहोत हे सिद्ध होते ही मौज काही औरच आहे . थँक्स गुरुजी. भर कलियुगात ही अनोखी मौज केवळ आपली कृपा आहे. आपला नित्य जयजयकार असो.

# पाणी आडवा पाणी जिरवा

## उत्कृष्ट मोहिमेस मा . जिल्हाधिकारी श्रीमती आशिम मित्तल यांच्या हस्ते ता .अंबड येथे शुभारंभ

रामेश्वर तांगडे ।उपसंपादक

आज दिनांक २५ / ०२ / २०२६बुधवार रोजी ठीक दुवारी ३.३०वाजता अंबड तालुक्यात वाघलखेडा आणि सारंगपूर च्या शेतकऱ्यांच्या पुढाकाराने आकार संस्थेच्या आर्थिक मदतीने लोकसभागातून पहिल्या मा जिल्हाधिकारी श्रीमती आशिम मित्तल यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जे सी बी चे पूजन करून नारळ फोडून खोदकामाला सुरुवात करण्यात आली

जिल्हाधिकारी मॅडमनी सर्व शेतकऱ्यांचे कौतुक करून उपस्थित सर्वांना शासकीय योजनेच्या माहिती देऊन शेतकऱ्यांच्या शेत रस्ता,कोट्यावधी रुपयांचा खर्च होऊनही कोल्हापुरी बंधाऱ्यांना दरवाजा नसल्यामुळे पाणी साचत नसल्याने संबंधित विभागाची चौकशी लावण्याचे उपस्थित अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले

तसेच माननीय तहसीलदार श्री विजय चव्हाण यांनी छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान अंतर्गत लोक कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करिता ग्राम स्तरावर सर्व प्रलंबित कामे करून घेण्यासाठी १४ मार्च पासून सुरू




होणाऱ्या जनजागृती मोहीम संदर्भात सखोल माहिती दिली

वाघलखेडा येथे गट नंबर ०८मधील ७५ फूट रुंदी असलेल्या नाल्याचे शेतकऱ्यांच्या मदतीने दगड आणि सिमेंट चा बंधारा बांधकामासाठी जे सी बी द्वारे खोदकाम करिता अंबडचे मा . उपविभागीय अधिकारी श्री उमाकांत पारधी, मा .तहसीलदार श्री विजय चव्हाण

मा .गट विकास अधिकारी श्रीमती ज्योती कवडादेवी, मा .तालुका कृषी अधिकारी श्री बाळासाहेब गंडे, मा .मंडळ अधिकारी श्री सुनील कारमपुरी, मा .तलाठी श्रीमती शारदा घाटे, मा .ग्राम विकास अधिकारी श्री येमुल,शेतकरी श्री अंकुश जाधव, श्री श्याम काकडे, श्री नरेंद्र जोगड, श्री सुनील काकडे, श्री राजू डोके, श्री नामदेव राऊत, श्री उद्धव काकडे, श्री दिनेश काकडे, श्री गजानन घुले, श्री गणेश सानप, श्री संतोष पिलांगे, श्री भगवान रेगुडे, श्री रवी मसलकर, यांची उपस्थिती होती यासाठी गेल्या आठ महिन्यापासून शेतकरी श्री सुरेश घुले यांनी अथक परिश्रम घेतले

आर्थिक सहकार्य करणारी आकार संस्था राजस्थान चे श्री कृष्णा करोडिया जलक्रांतीच्या वतीने स्थानिक समन्वयक देवा चित्राल यांनी कामकाज पाहिले

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब यांनी निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय : दैनिक मराठवाडा दर्शन, माधव नगर, धारूर रोड, केज ता.केज जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - हंडीबाग दत्तात्रय बालासाहेब

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY HANDIBAG DATTATRAY BALASAHEB AND PUBLISHED BY HANDIBAG DATTATRAY BALASAHEB ON BEHALF OF HANDIBAG DATTATRAY BALASAHEB AND PRINTED AT NIRMITEE PRINTS, KABAD GALLI, BEED TQ.DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT.THE OFFICE OF DAILY MARATHWADA DARSHAN, At.MADHAV NAGAR, DHARUR ROAD, KAIJ TQ.KAIJ, DIST.BEED ( MAHARSHTRA).
EDITOR- HANDIBAG DATTATRAY BALASAHEB